43

IO प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): धाराशिव **P.S.**(ठाणे): आनंदनगर
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0128 **Year** (वर्ष): 2025
**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):25/03/2025 21:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 25/03/2025
**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 25/03/2025
**Time From** (वेळेपासून): 15:46 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 15:46 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 25/03/2025 **Time** (वेळ): 21:01 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 040
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/03/2025 21:01 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): सेंट्रल बिल्डींग चौकातील , प्रियदर्शन ज्युसचे गाडयावर,धाराशिव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव): आनंदनगर
**District(State)** (जिल्हा(राज्य)): धाराशिव(महाराष्ट्र)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महेश वैजीनाथ साळुंके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामयुरबन सोसायटी, लातुर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लोहारा, तालोहारा, ,जि धाराशिव ,आनंदनगर,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8446040404

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नरसिंग तुकाराम सुर्यवंशी | | | 1. लिंबगाव, ता उदगीर,,जि लातुर, लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी महेश वैजीनाथ साळुंके, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद - पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी), नेमणुक - तालुका वैदयकीय अधीकारी कार्यालय, लोहारा, ता.लोहारा, जि. धाराशीव ,रा.मयुरबन सोसायटी, लातुर. मोबाईल नंबर 8446040404
मी दिनांक 25.03.2025 रोजी लाचलुचपत प्रतीबंधक कार्यालय, धाराशीव येथे पोनि राठोड साहेब यांचे समक्ष हजर येवुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन तालुका वैदयकीय अधीकारी कार्यालय, लोहारा येथे पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी) या पदावर सन 2013 पासुन नेमणुकीस आहे. सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव हे माझे मुख्यालय आहे. माझा दर महीन्याचा पगार व टी.ए.बील हे मुख्यालयाडून मीळते. मुख्यालयाचे ठीकाणी पगार व टी.ए. बील काढण्याचे काम माळी हे करतात. माझा फेब्रुवारी 2025 या महीन्याचा पगार अदयाप झालेला नाही. तसेच सन 2023-24 मधील टी.ए.बील अदयाप पावेतो मला मीळालेले नाही. सन 2023-24 मधील टी.ए.बील मी मुख्यालयास यापुर्वी सादर केलेले आहे. सदरचे बील व मागील महीन्याचा पगार अदयाप न झाल्याने मी दिनांक 21.03.2025 रोजी सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथे गेलो होतो. तेव्हा तेथे सदर कार्यालयातील सुर्यवंशी यांची भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी मला कशासाठी आलात याबाबत विचारले असता, मी त्यांना माझा फेब्रुवारी 2025 चा पगार व सन 2023-24 मधील टी.ए.बील अदयाप पावेतो मला मीळालेले नाही. ईतर सर्व कर्मचारी यांना मागील वर्षातील टी.ए.बील मिळालेले आहे असे बोललो. तेव्हा त्यांनी तुम्ही मागील वर्षातील टी.ए.बील काढण्यासाठी पैशे कुठे दिले आहेत. तसेच पगारासाठी दर महीन्याला 5000/- रुपये दयावे लागतात हे तुम्हाला माहीत असुन देखील तुम्ही जानेवारी 2025 पासुन दर महीन्याचे 5000/- रुपये देखील दिलेले नाहीत. एकुण 3 महीन्याचे 15000/- रुपये व टी.ए.बीलाचे मागील वर्षाचे तसेच चालु वर्षाचे असे 10,000/- रुपये असे एकुण 25000/- रुपये दया, मग मी लगेच माळींना व कोरे साहेब यांना सांगुन तुमची सर्व बीले काढतो असे म्हणाले वगैरे तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 25.03.2025 रोजी सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथील सुर्यवंशी, पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी) हे माझेकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत मला व पंच क्र. 1 शिंदे यांना योग्य त्या सुचना देऊन सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोनी राठोड साहेब यांनी घेतला. त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर 12.21 वा.चे सुमारास माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला माझेकडील हुंडाई कंपनीची वेन्यू कार क्रमांक एम एच 12, व्ही.सी. 1349 ने व पंच क्रमांक 1 शिंदे यांना त्यांचेकडील हीरो कंपनीची मोसा क्रमांक एम एच 25 ए टी 8227 ने रवाना होवुन सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथे जावुन सुर्यवंशी साहेब यांची भेट घेतली. तेव्हा सुर्यवंशी साहेब मी व पंच असे सेंट्रल बिल्डींग चौकातील चहाचे टपरीवर गेलोत. तेथे आमचेत माझे पगार व सन 2023-24 तसेच चालु वर्षातील टी.ए.बीला बाबत चर्चा झाली. तेव्हा सुर्यवंशी साहेब यांनी माझेकडे तीन महीन्याच्या पगाराचे 5000/- रुपये प्रमाणे 15,000/- रुपये, टी.ए.बीलासाठी 7000/- रुपये व हॉटेलचे बील 5000/- रुपये असे एकुण 27000/- रुपयाची मागणी केली. तेव्हा मी त्यांना सध्या एवढे पैसे नाहीत माझेकडे, सध्या मी 15,000/- रुपये देतो असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ठीक आहे. उर्वरीत 12,000/- रुपये दोन दिवसांनी पगार झाल्यावर दया असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ठीक आहे. 15,000/- रुपये घेवुन येतो असे म्हणालो. त्यानंतर त्यांचे कार्यालयात जावुन डॉ.कोरे साहेब यांची भेट घेतली. त्यांचेशी कामाचे अनुषंगाने बोलणे झाल्यानंतर मी व पंच क्र.1 शींदे असे आप आपल्याकडील वाहनाने परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येऊन पोनि राठोड यांना घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर पोनि राठोड यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये झालेले संभाषण ऐकले असता, सुयर्वंशी, पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी) यांनी माझा जानेवारीचा 2025 चा पगार काढल्याबददल तसेच फेब्रुवारी व मार्च महीन्याचा पगार

आणी सन 2023-24 मधील टी.ए.बील त्यांचे कार्यालयातील माळी यांना सांगुन काढण्यासाठी पंचासमक्ष माझेकडे 27,000/- रूपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 15,000/- रुपये लागलीच स्वीकारण्याचे व उर्वरीत 12,000/- रुपये पगार झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन पोनि राठोड यांनी सापळा आजमावणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि. राठोड साहेब यांनी मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचा आणि अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग समजावुन सांगुन, त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सापळा पुर्व कारवाई करण्यात आली. त्यानंतर मी सापळा कारवाई साठी हजर केलेल्या नोटांना पोलीस अंमलदार भोसले यांनी अँथ्रासिन पावडर लावुन, सदरच्या नोटा माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवल्या. पोनि राठोड साहेब यांनी मला सुर्यवंशी साहेब यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाच रक्कम स्विकारल्यानंतरचा करावयाचा इशारा नेमुन दिला. त्यानंतर पोलीस अंमलदार हजारे यांनी माझेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिले. त्यानंतर मी माझेकडील कारने 15.27 वा. पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील मोटार सायकलने रवाना होवुन सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथे गेलोत. तेथून मी सुर्यवंशी साहेब यांना फोन केला असता ते सेंट्रल बील्डींग चौकातील प्रीयदर्शन ज्युसचे गाडयावर आले. तेथे आमचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. दरम्यान सुर्यवंशी यांनी पैशे देणे बाबत मला हाताने ईशारा केला. तेव्हा मी माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या समोरील खीशातील अँथ्रासीन पावडरयुक्त 15000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन सुर्यवंशी यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजवे हाताने घेवुन पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खीशामध्ये ठेवुन दिली.तेव्हा मी मला नेमुन दिलेला पुर्वनियोजीत ईशारा डावा हात केसावरुन फिरवुन 15.46 वाजताचे सुमारास लाच स्वीकृतीचा ईशारा केला. ईशारा प्राप्त होताच पोनी राठोड साहेब व पंच क्रमांक 2 व सापळा पथक हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यावेळी पोशी हजारे यांनी माझयाकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. तेव्हा पोनी राठोड साहेब यांनी पंच क्रमांक 1 यांना विचारणा केली की, तक्रारदार यांना कोणी लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम कोणी स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक 1 यांनी सुर्यवंशी यांचेकडे हाताने ईशारा करून सांगीतले की, त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून स्वत: लाच रक्कम स्वीकारलेली आहे. त्यानंतर पोनी राठोड साहेब यांनी सुर्यवंशी यांना ताब्यात घेवुन स्वत:चा परिचय देवुन त्यांचा नाव व पत्ता विचारले असता, सुर्यवंशी यांनी त्यांचे नाव नरसिंग तुकाराम सुर्यवंशी, वय 50 वर्ष, पद पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी), सहा.संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डीग, धाराशीव, सध्या रा.कोर्टाचे पाठीमागे, समर्थ नगर, पवार यांचे घरी भाडयाने, धाराशीव, मुळ रा.लिंबगाव, ता.उदगीर,जि.लातुर असे सांगीतले. त्यानंतर तेथे पोनि राठोड व सापळा पथकाने तेथे पंचासमक्ष यशस्वी सापळा कारवाई नंतरची पुढील कायदेशीर कारवाई केली.

तरी सहा. संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डींग, धाराशीव येथील सुर्यवंशी, पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी) यांनी माझा जानेवारी 2025 चा पगार त्यांचे कार्यालयातील डॉ. कोरे व माळी यांना सांगुन काढल्याबददल तसेच फेब्रुवारी 2025 व मार्च 2025 महीन्याचा पगार आणी सन 2023-24 मधील टी.ए.बील डॉ.कोरे व माळी यांना सांगुन काढण्यासाठी पंचासमक्ष माझेकडे 27,000/- रूपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 15,000/- रुपये लागलीच स्वीकारण्याचे व उर्वरीत 12,000/- रुपये पगार झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य करुन अँथ्रासिन पावडरयुक्त लाच रक्कम 15,000/- रुपये सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष सुर्यवंशी यांनी स्वत: स्विकारली म्हणुन माझी नरसिंग तुकाराम सुर्यवंशी, वय 50 वर्ष, पद पॅरामेडीकल वर्कर (कंत्राटी), सहा.संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सेंट्रल बिल्डीग, धाराशीव, सध्या रा.कोर्टाचे पाठीमागे, समर्थ नगर, पवार यांचे घरी भाडयाने, धाराशीव, मुळ रा.लिंबगाव, ता.उदगीर,जि.लातुर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितले प्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करुन, त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली, ती मी वाचुन पाहिली माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA PANDURANG KHANDEKAR(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA PANDUR/

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे